# प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना

बँकेचे नाव

विमा कंपनीचा लोगो　　　　योजनेचा लोगो　　　　बँकेचा लोगो

## संमती पत्र / घोषणा फॉर्म

(ठरविलेल्या "नोंदणी काळात" योजनेत सामील होणाऱ्या सभासदांनी भरावा)

**कार्यालयीन उपयोगासाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रतिनिधी / बँक मित्र नाव - | | प्रतिनिधी / बँक मित्र कोड क्र. | |
| प्रतिनिधी / बँक मित्र बँक खाते तपशील | | | |
| प्रतिनिधी / बँक मित्र सही | | | |

भारतीय आयुर्विमा महामंडळाची "प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना" मास्टर पॉलिसी क्र.________________ (पूर्व मुद्रित करणे) आपल्या बँकेमार्फत प्रशासित केली जाणार आहे. या योजनेचा सदस्य बनण्यास मी मान्यता देत आहे.

प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजने अंतर्गत उपलब्ध असलेल्या जीवन संरक्षणाच्या हप्त्यापोटी आपल्या शाखेत असलेल्या माझ्या बचत खात्यात रु. ३३०/- (रु. तीनशे तीस फक्त) अधिक सेवा कर (लागू असल्यास) नावे टाकण्यास मी आपल्याला अधिकार देत आहे. भविष्य काळात, पुढील सूचना देण्यात येईपर्यंत, संरक्षणाच्या नूतनीकरणासाठी, दर वर्षी २५ मे ते १ जून या कालावधीत माझ्या बचत खात्यात रु. ३३०/- (रु. तीनशे तीस फक्त) अधिक सेवा कर (लागू असल्यास) किंवा वेळोवेळी ठरविण्यात येईल ती कोणतीही सुधारणा झाल्यास होणारी रक्कम, नावे टाकण्यासही मी आपल्याला अधिकार देत आहे.

मी दुसऱ्या कोणत्याही बँकेस या योजनेशी संबंधित विमा हप्ता नावे टाकण्यास अधिकार दिलेले नाहीत. माझा मृत्यू झाल्यास माझे जीवन विमा संरक्षण रु. २,००,०००/- पर्यंतच मर्यादित राहील याची मला कल्पना आहे.

योजनेचे नियम मी वाचले असून ते मला समजले आहेत व या द्वारे मी योजनेचा सदस्य होण्यास संमती देत आहे.

समूह विमा योजनेत सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेला माझा वैयक्तिक तपशील भारतीय आयुर्विमा महामंडळास कळविण्यासाठी मी बँकेस अधिकार देत आहे.

**बँकेच्या / आपला ग्राहक जाणा (K Y C ) च्या अभिलेखाप्रमाणे आवेदकाचा तपशील**

| | | | |
|---|---|---|---|
| बँकेच्या अभिलेखाप्रमाणे खातेदाराचे नाव | | | |
| बचत खाते क्र. | | आधार क्र. (असल्यास) | |
| ई मेल - | | मोबाइल क्र. | |
| नामांकन धारकाचे नाव, पत्ता आणि नाते (असल्यास) | | पालकाचे नाव व पत्ता (नामांकन धारक अज्ञान असल्यास) | |
| जन्म तारीख | | पत्ता | |

या योजने अंतर्गत मी वर उल्लेख केल्या प्रमाणे नामांकन करत आहे.

नामांकन धारक अज्ञान असल्याने वर उल्लेख केल्याप्रमाणे पालकाची नियुक्ती करण्यात येत आहे.

वरील सर्व विधाने ही सर्व बाबतीत सत्य असल्याचे मी घोषित करतो. वरील माहिती ही माझ्या या योजनेत सहभागी होण्याचा आधार आहे. वरील माहितीत असत्यता आढळल्यास या योजनेतील माझा सहभाग संपुष्टात येईल यास मी मान्यता देत आहे.

तारीख :　　　　सही______________________

पत्ता______________________

स्वाक्षरी साक्षांकित
प्राधिकृत अधिकारी ( बँकेच्या शाखेचे नाव व कोड क्र. असलेला रबरी शिक्का )

---

## पावती (अनुज्ञेय) आणि विमा संरक्षणाचा दाखला

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजने अंतर्गत बचत खात्यातून परस्पर रक्कम वळती करण्यासाठी संमती व अधिकार देण्याचा फॉर्म श्री / श्रीमती ________________________ बचत खाते क्र.______________ आधार क्र. (असल्यास)__________ यांचेकडून मिळाला. सदर योजने अंतर्गत जीवन विमा संरक्षण भारतीय आयुर्विमा महामंडळ, मास्टर पॉलिसी क्र.________________ यांचेशी संलग्न असून जीवन विमा संरक्षण वरील माहितीच्या सत्यतेवर / पात्रतेवर अवलंबून राहील.

**बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी आणि शिक्का**

# प्रधानमंत्री जीवन-ज्योती बिमा योजना- दावा अर्ज

**(दावा करणा-यांनी आणि बँकेनी भरावयासाठी)**

१. योजनेचे नाव : **प्रधानमंत्री जीवन-ज्योती बिमा योजना**

२. पॉलिसी क्र. : ______________________

३. बँकेचे संपुर्ण नाव आणि पत्ता : ______________________

______________________

______________________

४. मृत व्यक्तीचे संपुर्ण नाव : ______________ LIC ID : ______________

५. सदस्याची या योजने मध्ये भाग घेतल्याची तारिख : ______________________

६. सदस्य मृत्यु झाल्याची दिनांक : ______________________

७. मृत्युचे कारण अपघात आहे का : हो/ नाही
जर अपघानाचे मृत्यु झाला असेल तर, त्या बाबतचे पुरावे द्या

८. नामांकित केलेल्याचे नाव*: ______________________

______________________

आम्ही याद्वारे असे जाहीर की आम्ही वर दिलेली सर्व माहीती खरी आहे. आम्ही याबरोबर सदस्याच्या **मृत्युचा पुरावा** म्हणुन मृत्यु प्रमाणपत्र जोडत आहे.

* जर नामांकित व्यक्ती वयाने लहान असेल तर त्याचे पालक हा हक्क अर्ज भरू शकतात.

(नामांकित व्यक्तीची सही*/ दावा करणा-याची)

______________________

आम्ही याद्वारे प्रमाणित करतो की वरील सदस्य PMJJBY योजनेच्या अंतर्गत सुरक्षीत होते आणि त्याच्या नूतनीकरणाच्या वेळी त्यांच्या बँक खात्यामधुन त्यांच्या मरणा अगोदर पैसे जमा व्हायचे. आम्ही असेही प्रमाणित करतो की, आमच्या माहीती प्रमाणे श्री./ श्रीमती ______________________

______________________ हे वरील सदस्याचे नामांकित केलेले व्यक्ति आहेत

ठिकाण:
दिनांक

(बँकेच्या अधिकृत व्यक्तिकडून करण्याची सही)
(शिक्का)

सोबत जोडले आहे: मृत्यु प्रमाणपत्र, डिस्चार्ज फॉर्म, विमा प्रमाणपत्र,
जर मृत्यु अपघाताने झाला असेल तर FIR, PMR पंचनामा जोडला जाईल

# प्रधान मंत्री जीवनज्योती विमा योजनेचे नियम

**योजनेची तपशिलवार माहितीः**

या योजनेत एका वर्षाचे विमा संरक्षण मिळेल, त्याचे दर वर्षाला नूतनीकरण केले पाहिजे, या विमा योजनेत कोणत्याही कारणामुळे झालेल्या मृत्युसाठी विमा संरक्षण देऊ केले आहे. ही योजना एलआयसी आणि इतर जीवन विमा कंपन्यांमार्फत देऊ केली जाईल /चालविली जाईल,ज्या हे उत्पादन समान अटींवर या कारणासाठी बँकेशी योग्य मान्यतेने आणि जोडून देऊ करण्याची इच्छित असतील.यात सहभागी होणाऱ्या बँका त्यांच्या खातोदारांसाठी या योजनेची अंमलबजावणी करताना कोणत्याही अशा प्रकारच्या जीवन विमा कंपनीला नेमू शकतील.

**संरक्षणासाठी उपलब्ध संधीः** १८ ते ५० वर्षांपर्यंतच्या सहभागी बँकमध्ये बचत खाते असणाऱ्या सर्व खातेदारांना यात सामील होता येईल. जर एखाद्या व्यक्तीचे वेगवेगळ्या बँकांमध्ये बचत खाती असतील तर ती व्यक्ती फक्त एकाच बचत खात्याद्वारे या योजनेत सामील होऊ शकते.बँक खात्यासाठी आधार कार्ड हे एक प्राथमिक केवायसी असेल.

**नोंदणीचा कालावधीः** शुभारंभाच्या सुरूवातीला संरक्षण कालावधी, १जून २०१५ पासून ते ३१ मे २०१६ साठी ग्राहकांना नोंदणी करणे आवश्यक आहे आणि ३१ मे २०१५ पूर्वी त्यांचे ऑटो डेबिट संमती पत्र दिले पाहिजे.संभाव्य संरक्षणासाठी उशिरा म्हणजे ३१ ऑगस्ट २०१५ पर्यंत नोंदणी करता येईल, ज्याला भारत सरकारने अजून तीन महिन्यांची वाढ दिली आहे, म्हणजेच ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत. जे या तारखेनंतर नोंदणी करतील त्यांना संभाव्य संरक्षणासाठी संपूर्ण वार्षिक प्रिमियर भरून विहीत नमुन्यामध्ये स्वतःचे चांगल्या आरोग्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

**नोंदणीसाठी साहाय्यकारीः** हे संरक्षण १जून २०१५ ते ३१मे २०१६ पर्यंत मिळू शकेल, यासाठी प्रत्येक वर्षी ३१ मे पर्यंत विहीत अर्ज भरून नियुक्त बँकेच्या बचत खात्यातून ऑटो-डेबिटने पैसे भरण्याचा/सामील होण्याचा पर्याय आहे, आणि वर सांगीतल्याप्रमाणे आर्थिक वर्षासाठी याला वाढ दिलेली आहे. उशिरा भरलेले नोंदणी अर्ज संभाव्य संरक्षणासाठीच्या संपूर्ण वार्षिक प्रिमियमसह व चांगल्या आरोग्याच्या स्वयं-प्रमाणपत्रासह सादर करता येतील.

कोणत्याही वेळी या योजनेतून बाहेर पडलेल्या व्यक्ती भावी वर्षांमध्ये विहीत नमुन्यामध्ये चांगल्या आरोग्याचे घोषणापत्र सादर करून सामील होऊ शकतील.

भावी वर्षांमध्ये नवीन पात्र व्यक्ती किंवा सध्याचे पात्र व्यक्ती जेआधी सामील झालेले नाहीत किंवा ज्यांनी त्यांची सदस्यता मध्येच खंडित केली आहे ते या योजनेत चांगल्या आरोग्याचे स्वयं प्रमाणपत्र दाखल करून सामील होऊ शकतात.

लाभः कोणत्याही कारणामुळे सदस्याचा मृत्यु झाल्यास रू. २ लाख मिळणार आहेत.

**प्रिमियमः** प्रत्येक व्यक्तीला रू, ३३०/-प्रत्येक वर्षी. हा प्रिमियम खातेदाराच्या बँकेच्या बचत खात्यातून ऑटोडेबिट एकदाच होणार आहे, या योजनेअंतर्गत प्रत्येक वार्षिक संरक्षण कालावधीसाठी वर दिलेल्या पर्यायानुसार ३१ मेला किंवा त्याआधी. संभाव्य संरक्षणासाठी उशिरा नोंदणी करणाऱ्यांना ३१ मे नंतर वार्षिक प्रिमियमची पूर्ण रक्कम आणि चांगल्याआरोग्याचे स्वयं-प्रमाणपत्र दाखल केल्यानंतरच मिळू शकेल. वार्षिक दाव्यांच्या अनुभवावरून प्रिमियमचे पुनरावलोकन केले जाईल.तथापि, निसर्गाचे अनपेक्षित प्रतिकूल अपवाद वगळता, पहिल्या तीन वर्षात प्रिमियमच्या दरात वाढ होऊ नये यासाठी प्रयत्न केले जातील.

**पात्रतेच्या अटीः**

अ) सहभागी बँकेतील बचतखातेदारांनी ज्यांचे वय १८(पूर्ण) आणि ५० (येणाऱ्या वाढदिवसाला पूर्ण) वर्षे असेल त्यांनी या योजनेत नोंदणी करण्यासाठी त्यांचे संमतीपत्र/ ऑटोडेबिट करण्यासाठी वर उल्लेख केल्याप्रमाणे देणे आवश्यक आहे.

ब) ज्या व्यक्ती सुरूवातीच्या नोंदणी कालावधीनंतर म्हणजे, ३१ ऑगस्ट २०१५ किंवा ३० नोव्हेंबर २०१५ नंतर सामील होतील त्यांनी स्वतःचे चांगल्या आरोग्याचे प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक आहे आणि लागू होणाऱ्या संमतीपत्र व जाहीर पत्रात दिल्याप्रमाणे नोंदणीच्या तारखेपर्यंत किंवा त्याआधीचे त्याचे/तिचे गंभीर आजार नसल्याचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

**मास्टर पॉलिसी होल्डरः** सहभागी बँका या मास्टर पॉलिसी होल्डर असतील. एक साधे आणि सदस्यता मित्रत्वाचे व्यवस्थापन आणि क्लेम सेटलमेंट प्रक्रिया एलआयसी/ इतर विमा कंपनींकडून सहभागी बँकेशी सल्लामसलत करून निश्र्चित केले जाईल.

**हमी समाप्तिः** सदस्याच्या जीवनाची हमी खाली दिलेल्या पैकी कोणत्याही घटनेमध्ये समाप्त केली जाईल आणि त्याखाली मिळणारा कोणताही लाभ दिला जाणार नाहीः

१) वार्षिक नूतनीकरणाच्या वेळी ५५ वर्षे पूर्ण होणे(येणाऱ्या वाढदिवशी) (तथापि, ५0 वर्षांबाहेरच्यांना यात प्रवेश मिळणे शक्य नाही).

२) बँकेतील खाते बंद करणे किंवा विमा जबरदस्तीने चालू ठेवण्यासाठी अपुरी जमा रक्कम.

३) जर एखाद्या केसमध्ये एखादी व्यक्ती पीएमजेजेबीवायच्या खाली एलआयसी इंडियाकडून/ इतर कंपनीकडून एकापेक्षा जास्त खात्यांद्वारे संरक्षित आहे आणि एलआयसी/इतर कंपन्यांकडून तिला अनवधानाने प्रिमियम मिळाला आहे,तर त्या व्यक्तीचे विमा संरक्षण रू. २ लाखापर्यंत मर्यादित केले जाईल आणि त्याचा प्रिमियम मिळणार नाही.

४) जर विमा संरक्षण काही तांत्रिक कारणांमुळे जसेकी दिलेल्या तारखेला अपुरा निधी किंवा एखाद्या प्रशासकिय कारणांमुळे थांबले असेल तर पूर्ण वार्षिक प्रिमियमची पावती आणि चांगल्या आरोग्याचे समाधानकारक प्रमाणपत्र देऊन ते पुन्हा चालू करता येईल.

५) सहभागी बँका नियमित नोंदणीचे प्रिमियम ३0 जूनला किंवा त्याआधी प्रत्येक वर्षी विमा कंपनीला पाठवले पाहिजेत आणि इतर केसमध्ये ज्या महिन्यात मिळाले असतील त्याच महिन्यात पाठविले पाहिजेत.

**कारभाराची पध्दतीः**

वर वर्णन केलेल्या विषयाच्या योजनेचा कारभार एलआयसी पी व जीएस युनिटस/ इतर विमा कंपन्यांकडून चालविला जाईल. डाटा प्रवाह प्रक्रिया आणि डाटा माहिती वेगवेगळी दिली जाईल.

ऑटो डेबिटच्या प्रक्रियेतून दिलेल्या तारखेच्या आधी खातेदाराच्या खात्यातूनदिलेल्या पर्यायानुसार प्रिमियमची वार्षिक रक्कम एकरकमी जमा करून घेणे ही सहभागी बँकेची जबाबदारी असेल.

ही योजना चालू असेपर्यंत सदस्यांनी प्रत्येक वर्षी ऑटोडेबिटचा एक वेळचा जनादेश सुध्दा दिला पाहिजे.

नोंदणी अर्ज/ऑटो डेबिट मुखत्यारपत्र/संमती व जाहीर अर्ज विहीत नमुन्यांमध्येसहभागी बँकांकडून मिळाले पाहिजेत आणि राखून ठेवले पाहिजेत.क्लेमच्या संदर्भात एलआयसी/ विमा कंपन्यांनी तसेच सादर करण्याचा प्रयत्न केले पाहिजे.एलआयसी/ विमा कंपन्यांना कोणत्याही वेळी ही कागदपत्रे मागण्याचा हक्क आहे.

पोचपावती ही पोचपावती व विमा प्रमाणपत्राच्या रूपात दिले गेले पाहिजे.

या योजनेचा अनुभव तिची क्षमता वाढविणे इ. साठी वार्षिकतेच्या आधारावर तपासली जाईल, ज्याची आवश्यकता असेल तशी.

**प्रिमियमचे विनियोजनः**

१) एलआयसी/विमा कंपनीला देण्याचाविमा प्रिमियमःरू. २८९/-प्रति व्यक्ती प्रति वार्षिक

२) बीसी/मायक्रो/कार्पोरेट / एजंटयांच्या खर्चाची प्रतिपूर्तीः रू ३0/-प्रति वार्षिक प्रति सदस्य

३) सहभागी बँकेच्या कारभार चालविण्याच्या खर्चाची प्रतिपूर्तीः रू. ११ प्रति वार्षिक प्रति सदस्य.

ही योजना कार्यान्वित होण्याची ठरलेली तारीख आहे १ जून २0१५. पुढच्या वार्षिक नूतनीकरणाची तारीख संभाव्य वर्षांमध्ये सलग १जूनच राहील.

परिस्थितीनुसार आवश्यक असल्यास नव्या भावी नूतनीकरणाची तारीख अगोदरच बंद करण्याची जबाबदारी या योजनेची राहील.

वारंवार विचारण्यात येणारे प्रश्नक(एफएक्यूज)

दुसऱ्या पानावर समाविष्ट आहेत.

## पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेबद्दल नेहमी विचारले जाणारे प्रश्न

**प्र.१. या योजनेचे स्वरूप कसे आहे ?**

या योजनेत वर्षभरासाठी मुदत जीवन विमा योजना (टर्म लाइफ इन्शुरन्स) संरक्षण राहील ज्याचे दर वर्षी नुतनीकरण करावे लागेल. यात मृत्यू साठी संरक्षण देण्यात येईल.

**प्र.२. या योजनेत कसा फायदा मिळेल आणि याचे विमा प्रीमियम कसे राहील ?**

वर्गणी दाराच्या कोणत्याही कारणामुळे झालेल्या मृत्यू साठी २ लाख रुपये मिळतील . या योजनेचा विमा प्रीमियम हा दर वर्षाला रुपये ३३०/- प्रत्येक वर्गणी दराने द्यावयाचा आहे .

**प्र.३.प्रीमियम कसे देता येईल ?**

प्रत्येक वर्षात जो पर्यंत योजना चालू आहे तो पर्यंत खाते धारकाच्या बचत खात्यातून परस्पर रुपये काढण्याच्या निर्देशा नुसार एकदाच जसे योजनेत सहभागी होतांना पर्याय निवडला असेल तसा घेण्यात येईल. योजना कार्यान्वित राही पर्यंत वर्गाणीदाराला प्रत्येक वर्षी खात्यातून रुपये काढण्यासाठी एकदाच संमती द्यावी लागेल. या योजनेचा आढावा सरकार दर वर्षी घेत राहील त्यानुसार पुढील नियम, बदलू शकतात. .

**प्र.४. ही योजना कोण देवू शकतो, त्याची अंमलबजावणी कोण करेल ?**

ही योजना सार्वजनिक क्षेत्रातील जीवन विमा निगम LIC किवा इतर विमा कंपन्याद्वारा राबविली जाईल. ज्या या योजनेच्या नियमानुसार हेतू पूर्ण करण्यासाठी बँकांशी सहमत होईल. सहभागी बँका या त्यांच्या ग्राहकांसाठी अशी योजना राबविण्यासाठी कोणत्याही विमा कंपनीला यात सहभागी करू शकतात .

**प्र.५. या योजनेत कुणाला सहभागी होता येईल ?**

वर्षे १८ ते ५० या वयोगटातील सहभागी बँकांतील सर्व बचत खातेधारक या योजने साठी पात्र राहतील . **एकाच वेळी अनेक बँकात खाते असणाऱ्या ग्राहकाला फक्त एकच बचत खात्या मार्फत या योजनेत सहभागी होता येईल.**

**प्र.६. योजनेत सहभागी होण्याचा कालावधी कोणता आणि त्यातील बदल कसे आहेत ?**

या योजनेत विमा संरक्षण हे १ जून २०१५ ते ३१ मे २०१६ या काळा साठी एक वर्षा साठी राहील त्या साठी स्विकृती नमुन्यात परस्पर रुपये जमा करण्याचे संमती पत्र हे आवश्यक असून , दर वर्षी ३१ मे पर्यंत प्रीमियम भरता येईल त्याची वाढीव मुदत ३१ आगस्ट २०१५ ही पहिल्या वर्षा साठीच राहील. या नंतर सहभागी होणाऱ्या वर्गणी दारांना पूर्ण वार्षिक प्रीमियम द्यावे लागेल आणि स्वतः दिलेले स्वतःचे निरोगी असल्याचा दाखला द्यावा लागेल.

ज्यांना पुढील वर्षी योजनेत सहभागी व्हायचे आहे त्यांनी प्रीमियम परस्पर खात्यातून वजा करण्याचे निर्देश दर वर्षी ३१ मे पूर्वी द्यावे. या नंतर सहभागी होणाऱ्या वर्गणी दारांना पूर्ण वार्षिक प्रीमियम द्यावे

लागेल आणि स्वतः दिलेले स्वतःचे निरोगी असल्याचा दाखला द्यावा लागेल. सदस्य बनू शकतात. पात्र नवीन सदस्य, आणि ज्यांनी अगोदर सहभाग घेतला नाही ते पुढील वर्षात भविष्यात कधीही योजना चालू राहिली तर सदस्य बनू शकतात.

**प्र.७. प्रथम वर्षी सहभागी होवू न शकणारा पात्र ग्राहक पुढील वर्षी या योजनेत सहभागी होवू शकतो काय ?**

हो. परस्पर पैसे काढण्याच्या सेवेनुसार नवीन पात्र सदस्य या योजनेत सहभागी होवू शकतात.त्यांनी प्रीमियम परस्पर खात्यातून वजा करण्याचे निर्देश देवून सहभागी होता येईल . स्वतः दिलेले स्वतःचे निरोगी असल्याचा दाखला द्यावा लागेल.

**प्र.८. योजना सोडून जाणारा व्यक्ती परत योजनेत सहभागी होवू शकतो काय ?**

कोणत्याही क्षणी सोडून जाणारा व्यक्ती परत योजनेत सहभागी होवू शकतो, वार्षिक प्रीमियम देवून तो योजनेत प्रवेश करू शकतो. त्यासाठी त्याला स्वतः दिलेले स्वतःचे निरोगी असल्याचा दाखला द्यावा लागेल.

**प्र.९. या योजनेत मास्टर पॉलिसी धारक कोण असेल ?**

सहभागी बँक ही सहभागी ग्राहकाच्या वतीने मास्टर पॉलिसी धारक असेल . या बँकेने आणि विमा संरक्षण देणारी जीवन विमा कंपनी LIC यांनी साधी सोपी आणि ग्राहक हितदक्ष अस्थापना आणि क्लेम देणारी यंत्रणा उभारावी.

**प्र.१० . या योजनेतील सहभागी ग्राहकावरील जीवन संरक्षण केव्हा संपुष्टात येते ?**

सदस्याचे जीवन संरक्षण हे खालील बाबतीत संपते :

१) जन्म तारखेनुसार वय वर्ष ५५ झाल्यावर (जी जवळची जन्मतारीख असेल).दर वर्षी वार्षिक सहभाग हा महत्वाचा आहे (, असे असले तरीही वय वर्षे ५० नंतर सहभाग घेता येणार नाही .)

२) बचत खात्यात अपेक्षित शिल्लक नाही म्हणून आणि जीवन विमा प्रीमियम भरण्याच्या असमर्थतेत .

३) जर सदस्य हा एका पेक्षा जास्त बचत खात्या मार्फत या योजनेत संरक्षित असेल तर , अश्या वेळी LIC /जीवन विमा कंपनीला असे अनेक प्रीमियम प्राप्त झाले तर फक्त २ लाख रुपयाचे जीवन विमा संरक्षण मिळेल आणि अन्य प्रीमियम परत केले जाणार नाहीत.

**प्र.११. या योजनेत विमा कंपनी आणि बँक यांची भूमिका काय राहील ?**

१) ही योजना सार्वजनिक क्षेत्रातील जीवन विमा कंपनीLIC द्वारा आणि जीवन विमा कंपन्यांद्वारा राबविल्या जातील. या योजनेच्या नियमानुसार सामाईक हेतू पूर्ण करण्यासाठी बँकांशी सहमत होतील. सहभागी बँका या त्यांच्या ग्राहकांसाठी अशी योजना राबविण्यासाठी कोणत्याही जीवन विमा कंपनीला यात सहभागी करू शकतात .

२) योग्य वार्षिक प्रीमियम हे बचत खाते धारकाच्या खात्यातून ठराविक वेळेत आणि एकाच हप्त्यात **परस्पर पैसे काढण्याच्या प्रक्रियेनुसार** काढणे ही जबाबदारी सहभागी बँकेची असेल .

3) सहभागी सदस्यांकडून ठराविक **नमुन्यातील सहभागी होण्याच्या फॉर्म** आणि संमती पत्र तसेच **परस्पर पैसे काढण्याचा फॉर्म** हे दस्तावेज सदर बँक जमा करून घेईल. LIC जीवन विमा कंपनीला हे दस्तावेज परत कधीही मागविण्याचा अधिकार असेल.

**प्र.१२. प्रीमियम चा तपशील सांगा ?**

१) **LIC अन्य जीवन** विमा कंपनीला प्रत्येक ग्राहक या प्रमाणे २८९/- रुपये वार्षिक असे प्रीमियम राहील.

२)प्रत्येक ग्राहक या प्रमाणे दर वर्षी ३०/- रुपये या प्रमाणे BC/Micro/Corporate/Agent यांना खर्च देणे.

३) प्रत्येक ग्राहक या प्रमाणे दर वर्षी ११/- रुपये या प्रमाणे बँके ला अस्थापना खर्च मिळेल.

**प्र. १३. हे विमा संरक्षण ग्राहकाने घेतलेल्या अन्य विमा संरक्षणाच्या व्यतिरिक्त असेल काय ?**

होय.

**प्र.१४. सर्व जॉइंट खाते धारक उल्लेख केला गेलेल्या खात्याद्वारे ह्या योजनेत सहभागी होऊ शकतात का ?**

जर ते पात्रतेचे निकष पूर्ण करत असतील आणि प्रती व्यक्ती दर वर्षी रू. ३३०/- या दराने प्रिमीयम (हप्ता) भरत असतील तर सर्व जॉइंट खाते धारक उल्लेख केला गेलेल्या खात्याद्वारे ह्या योजनेत सहभागी होऊ शकतात.

**प्र.१५. परदेशस्थ भारतीय (एन.आर.आय.)कव्हरेज मिळण्यासाठी या योजनेअंतर्गत पात्र असतील का ?**

कुठल्याही भारतीय बँकेच्या शाखेत योग्य बँक खाते असलेला कुणीही परदेशस्थ भारतीय पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेसाठी पात्र असेल मात्र योजनेशी संबंधित अटी आणि शर्तींच्या अधीन राहुन. क्लेमचा प्रश्न उद्भवल्यास लाभधारक/हक्कदारास क्लेम फक्त भारतीय चलनाच्या स्वरुपातच मिळेल.

**प्र.१६. भारतीय पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेसाठी कुठले बँक खाते योग्य असेल ?**

संस्थांशी संबंधित खाते वगळता सर्व प्रकारच्या खात्यांचे धारक या योजनेसाठी पात्र असतील.

**प्र.१७. नैसर्गिक आपत्ती जसे की भूकंप, पूर इ. मुळे होणारे मृत्यू/ अपंगपणा या कारणांना ही योजना लागू असेल का ? तसेच खून/ आत्महत्या यासारख्या घटनांदेखील ही योजना लागू असेल का ?**

या वरील सर्व घटना भारतीय पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत कव्हर केल्या जातील.

**प्र.१८. पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेच्या पॉलिसीज (धोरणे) परदेशी विमा पॉलिसीजच्या साहाय्याने सुरु झाल्या आहेत का आणि काम करत आहेत का ?**

भारतात अशा कुठल्याही परदेशी विमा कंपनीज थेटपणे काम करत नाहीत. विमा कायदा आणि IRDA नियमांनुसार भारतीय कंपनीज बरोबर काही परदेशी नवीन काम करीत आहेत, जेथे त्यांचा समभाग ४९% पर्यंतच मर्यादित आहे.

**प्र.१९. इतर जीवन विमा सेवांच्या विरुद्ध, पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेचे फायदे विमाधारकाच्या वारसास/हक्कदारासच मिळतात. इतर जीवन विमा पॉलिसीजमध्ये उपलब्ध असणारे मॅच्युरिटी फायदे किंवा सरेंडर व्हॅल्यू इथे का नसते ?**

या योजनेचा कव्हर फक्त मृत्यूनंतर मिळतो आणि म्हणूनच फक्त विमाधारकाच्या वारसास/हक्कदारासच मिळतो. पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना ही प्युअर टर्म पॉलिसी आहे, ज्यात कुठलाही गुंतवणुकीचा भाग समाविष्ट नसून ती मृत्यूबाबतच्या घटना कव्हर करते. इतर पॉलिसीजच्या मानाने किंमतही कमी आहे. समाजातील दुर्बल घटकांना जीवन विम्याचे फायदे देण्यासाठी ही योजना तयार केली आहे. म्हणूनच गुंतवणुकीचा भाग टाळून प्रिमियम (हप्ता) ही कमी ठेवला आहे.

**प्र.२०. पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना, जिचा आग्रहाने प्रसार केला जात आहे आणि विकली जात आहे ती परदेशी विमा कंपनीजना, ज्या भारतीय कंपनीज बरोबर काम करीत आहेत, त्यांना मोठ्या प्रमाणात नफा मिळवून देईल का ?**

MsM मध्ये फक्त फक्त विमा कायद्याने उल्लेखित केलेल्या भारतीय विमा कंपनीज काम करु शकतात. परदेशी विमा कंपनीज बरोबर काम करणाऱ्या अश्या कंपनीतील विमाधारकांचे फंड्स नियमानुसार भारतात गुंतविले जातात आणि परदेशात नाही. या योजनेत घेतला जाणारा हप्ता हा विमाशास्त्रीय शुल्क, जोखमीचे घटक, सध्याचा मृत्यूदर यांचा विचार करुन घेतले जातात. त्यामुळे योजनेतून कोणत्याही मोठ्या प्रमाणात नफा मिळण्याची शक्यता नाही.

**प्र.२१. LIC सारखी सरकारी संस्था असताना, जी ही सरकारी योजना चालवू शकली असती, असे असताना परदेशी विमा कंपनीज पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेशी का संबंधित आहेत?**

भारतात २४ जीवन विमा कंपनी कार्यरत आहेत, ज्यांना विमा व्यवसाय करण्यासाठी IRDAI कडून परवाना मिळाला आहे. स्पर्धा वाढविण्यासाठी, ग्राहकांना उत्तम सेवा आणि योग्य किंमत देण्यासाठी या सर्व कंपन्यांना सहभागी होण्याची परवानगी आहे. त्या सर्व भारतीय कंपन्यांचे परदेशी भागीदार असल्यास त्यांचा कंपनीत फक्त ४९% पर्यंतच समभाग असतो. म्हणूनच LIC हीच या योजनेतील एकमेव प्राथमिक विमा कंपनी आहे.

**प्र. २२. क्लेम्सची पूर्तता न झाल्यास भारतातील परदेशी विमा कंपनीजवर काही कायदेशीर कारवाई करता येणे शक्य आहे का ?**

भारतात अशा कुठल्याही परदेशी विमा कंपनीज थेटपणे काम करत नाहीत. विमा कायदा आणि IRDA नियमांनुसार  भारतीय कंपनीज बरोबर काही परदेशी नवीन काम करीत आहेत, जेथे त्यांचा समभाग ४९% पर्यंतच मर्यादित आहे. व्याख्येनुसार त्या भारतीय विमा कंपनीजच आहेत. त्या सर्व कंपनीज भारतीय कायद्याच्या आधीन आहेत आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करता येणे शक्य आहे.

**प्र. २३. हप्त्याचे दर वाढू शकतात. किंवा कंपनीज भविष्यात योजना बंद करु शकतात का ?**

विमा हा इतर सेवांसारखाच असतो. हप्त्याचे दर भविष्यात वाढू शकतात, २४ भारतीय विमा कंपनीत असलेल्या स्पर्धेमुळे दर स्थिर राहण्याची शक्यता आहे. पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजन व्यवहार्य असेल आणि ती बंद व्हायची शक्यता कमी आहे जर काही विशिष्ट परिस्थितीत असे काही घडलेच तर बँकेकडे इतर ठिकाणी भागीदारी करण्याचे पर्याय उपलब्ध असतात.